**Dr. Babasaheb Ambedkar Marathwada University**
**Aurangabad – 431 004, Maharashtra, India**
NACC Re-accredited 'A' Grade
Office PBX : (0240) 24033900/400
Office Tele : (0240) 2403218 / 2403223
Affiliation: (0240)2403118/2403119/2403115
Web Site : www.bamu.ac.in
http://bamua.digitaluniversity.ac

स्थापना वर्ष : १९५८

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ**
**औरंगाबाद- ४३१ ००४, महाराष्ट्र, भारत**
नॅक समितीतर्फे 'अ' दर्जा प्राप्त
Office : Academic Section
कार्यालय :- शैक्षणिक विभाग (संलग्नीकरण)

संदर्भ क्र. : शैक्ष/ संलग्न/ आरएम/ २०२०-२१/ 28977-79

दिनांक :-२६-०२-२०२१

**प्रति,**
**मा. सचिव,**
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,
महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, विस्तार भवन,
**मुंबई-४०००३२.**

**विषय :- डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ कार्यक्षेत्रा अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करीता नवीन प्रस्तावित महाविद्यालयांचे प्रपत्र - "क्ष" अन्वये नकारात्मक शिफारशिसह इरादापत्र मिळणे संदर्भात प्रस्ताव सादर करणे बाबत.**

**संदर्भ :-** १) नवीन प्रस्तावित महाविद्यालयांचे प्रस्ताव विहित प्रक्रिया करुन शासनास सादर करणे बाबत शासन निर्णय दि.१५ सप्टेंबर २०१७.

२) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ सुधारित कमल १०९ पोटकलम ३ खंड (क),(ग),(घ) अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेली तरतुद दि.०८-१२-२०२०.

३) विद्यापीठाने प्रसिध्द केलेला पंचवार्षिक बृहत आराखडा व वार्षिक वृहत आराखडा नुसार प्रसिध्द करण्यात आलेले स्थळ बिंदु प्रमाणे प्रसिध्द केलेली जाहिरात दि.२१-१२-२०२० अन्वये विद्यापीठास प्राप्त झालेले प्रस्ताव दि.३१ डिसेंबर २०२०.

४) नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या ठिकाणी शासन निर्णय दि.१५-०९-२०१७ अन्वये विहित पायाभुत सुविधा उपलब्ध आहे किंवा नाही याबाबत तपासणी करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेल्या विविध चौकशी समित्या दि.०६-०२-२०२१.

५) अधिष्ठाता मंडळाने नविन प्रस्तावित महाविद्यालयाचे प्रस्ताव छानणी / तपासणी करुन मा.कुलगुरु महोदय व व्यवस्थापन परिषदेस केलेली शिफारस दि. १६-०२-२०२१, दि. २०-०२-२०२१ व दि. २१-०२-२०२१.

६) नविन प्रस्तावित महाविद्यालयाचे प्रस्ताव शासनास शिफारशीत करणे बाबत व्यवस्थापन परिषदेने घेतलेला निर्णय दि.१७-०२-२०२१, दि. १८-०२-२०२१ व दि. २३-०२-२०२१.

७) नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या संदर्भात मा.कुलगुरु महोदयांनी घेतलेली सुनावणी दि.२२-०२-२०२१ व दि. २४-०२-२०२१.

महोदय,

उपरोक्त संदर्भिय विषयाच्या अनुषंगाने मा. कुलगुरु महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार आपणास विनंती पुर्वक कळविण्यात येते की, संदर्भ क्र. (३) अन्वये विद्यापीठ कार्यक्षेत्रातील अनुज्ञेय स्थळबिदु साठी विद्यापीठाने वार्षिक व पंचवार्षिक बृहत आराखड्यानुसार जाहिरात प्रसिध्द करुन दि.३१-१२-२०२० पर्यत प्राप्त झालेल्या एकुण १८२ प्रस्तावांच्या संदर्भात नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या ठिकाणी नियमामध्ये विहित केल्यानुसार पायाभुत सुविधा उपलब्ध आहे किंवा नाही या संदर्भात पाहणी / तपासणी करण्यासाठी मा.कुलगुरु महोदयांनी संदर्भ क्र. (४) अन्वये चौकशी / तज्ञ समिती नियुक्त करण्यात आलेली होती तद्अनुषंगाने प्राप्त झालेल्या तज्ञ समितीच्या अहवालानुसार प्राप्त प्रस्तावांची अधिष्ठाता मंडळा मार्फत छानणी तपासणी करुन अधिष्ठाता मंडळाने मा.कुलगुरु महोदय व व्यवस्थापन परिषदेस यथायोग्य शिफारशिसह अहवाल सादर करण्यात आला.

प्रस्तुत प्रकरणी शासन निर्णय दि.१५-०९-२०१७ अन्वये निश्चित करण्यात आलेले निकष, तज्ञ समितीने सादर केलेला अहवाल, अधिष्ठाता मंडळाची शिफारस, गावाची लोकसंख्या, विहित रक्कमेचा एफ.डी., दोन महाविद्यालयामधील अंतर, प्रस्तावित ठिकाणी नविन महाविद्यालयाची आवश्यकता, शैक्षणिक गुणवत्ता, उपलब्ध पात्र विद्यार्थ्यांची संख्या, तसेच उपलब्ध पायाभुत सुविधा इत्यांदी व तत्सम बाबीचा विचार करुन ज्या संस्थेची नविन प्रस्तावित महाविद्यालये प्रस्तुत अटी / शर्ती व निकष पुर्ण करीत नसतील अशा **प्रपत्र - "क्ष"** अन्वये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या नविन प्रस्तावित **एकुण १७०** महाविद्यालयांची विविध कारणे नमुद करुन **नकारात्मक शिफारशीसह** इरादापत्र मिळणे किंवा पुढील यथायोग्य कार्यावाहिस्तव आपल्या कार्यालयास सादर करण्यात येत आहे.

सोबत:- वरील प्रमाणे.

Rsuryawanshi

**कुलसचिव**

**प्रतिलिपी :-**

१. मा. संचालक, उच्च शिक्षण, शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर .
२. मा. सहसंचालक, उच्च शिक्षण, औरंगाबाद विभाग, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद यांना माहिती व योग्य त्या कार्यवाहीस्तव सादर .

स्वाक्षरीत/-

**कुलसचिव**

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ करिता विद्यापीठाने निश्चित केलेला बृहत आराखडा / बिंदु करिता प्राप्त झालेल्या नविन प्रस्तावित महाविद्यालयाच्या संदर्भात संकिर्ण माहिती तक्ता प्रपत्र-``क्ष``**

**औरंगाबाद शहर**

| अ. क्र. | अर्जदार संस्थेचे नाव / पत्ता व अध्यक्षाचे नाव (ई-मेल व दुरध्वनी क्रमांक) | प्रस्तावित अभ्यासक्रमासह नवीन महाविद्यालयाचे नाव व विद्याशाखा | अध्यादेश १५१ अन्वये निर्धारित प्रक्रिया शुल्क व भरलेले शुल्क | प्रस्तावित महाविद्यालयाचे ठिकाण बृहत आराखडयात निश्चित करण्यात आलेले आहे काय? तद्अनुषंगाने ठिकाणाचे नाव | मा. कुलगुरु महोदयांनी नियुक्त केलेल्या तज्ञ समितीने सादर केलेल्या अहवालानुसार तज्ञ समितीची शिफारस (यथायोग्य शेरासह सकारात्मक / नकारात्मक) | सकारात्मक व नकारात्मक शिफारस करण्याची कारणे | व्यवस्थापन परिषदेची शिफारस |
|---|---|---|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) |
| ९3 | शिवा ट्रस्ट औरंगाबाद.<br><br>अध्यक्ष ,बाळासाहेब एस. पवार<br><br>मो. ०२४०-२३५६५६५<br><br>(C.C.-१८१८)<br><br>shivatrust@yahoo.com. | सेवन हिल्स कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲण्ड सायन्स जालना रोड, सेव्हन हिल्स, औरंगाबाद.<br><br>(आर्टस, कॉमर्स व सायन्स) | निर्धारीत केलेले कला- ३३०००/- वाणिज्य- ३३०००/- विज्ञान- ४५०००/- भरलेले शुल्क कला- ३६,३००/- वाणिज्य- ३६,३००/- विज्ञान- ४९,५००/- | औरंगाबाद शहर | तज्ञ समितीने स्वयंस्पष्ट शिफारस केलेली नाही. | १) प्रस्तुत संस्थेने मा. कुलगुरु महोदयांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या सुनावणीच्या वेळेस केलेला युक्तीवाद संयुक्तीक वाटला नाही.<br>२) नवीन प्रस्तावित महाविद्यालय सुरु करणाऱ्या संस्थेकडे सद्यस्थितीत जूने संलग्नीत महाविद्यालय असून जुन्या महाविद्यालयाचे नॅक मुल्यांकन झालेले **नाही.**<br>३) सदरील भागातील विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहिलेले नाही.<br>४) नवीन प्रस्तावित महाविद्यालयाच्या ठिकाणी नियमामध्ये विहित केल्यानूसार आवश्यक पायाभूत सुविधा उपलब्ध नाही.<br>५) शासन निर्णय दिनांक १५ सप्टेंबर २०१७ अन्वये विहित केल्यानूसार परिशिष्ट-"अ" व "ब" प्रमाणे विहित करण्यात आलेल्या तरतूदी नूसार प्रस्तावित महाविद्यालयाकड आवश्यक पायाभूत सुविधा व सर्व अटी / शर्तीची पुर्तता सदरील महाविद्यालय करीत नाही.<br>६) नवीन प्रस्तावित ठिकाणी तसेच सदर भागामध्ये अशा प्रकारची महाविद्यालये कार्यरत आहेत. तद्अनुषंगाने परिसरातील लोकसंख्या व उपलब्ध पात्र विद्यार्थ्यांची संख्या लक्षात घेता शैक्षणिक गुणवत्ता टिकवण्याच्या दृष्टीने नवीन महाविद्यालयाची आवश्यकता नाही. सबब, नकारात्मक शिफारस करण्यात येत आहे. | नकारात्मक शिफारस करण्यात येत आहे. |